**Newspaper: Maharashtra Times**

**Date: 30th March 2018**

**50th Youth Festival Prize Distribution Ceremony.**

कल्पेशराज कुबल



## ‘मटा’ करंडकावर पोदारची छाप

मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवाचा सुवर्ण महोत्सव गुरुवारी संध्याकाळी मोठ्या दिमाखात साजरा झाला. विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमध्ये रंगलेल्या या कार्यक्रमात माटुंगा येथील पोदार कॉलेजने ओव्हरऑल चॅम्पियनशिप मिळवत मानाच्या ‘मटा करंडकावर’ सलग दुसऱ्यांदा नाव कोरले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते हा करंडक पोदार कॉलेजला प्रदान करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. विष्णू मगरे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील, विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक नीलेश सावे तसेच पोदार कॉलेजचे उपप्राचार्य एस. नटराजन आणि प्रा. वृषाली कानेरी विद्यार्थ्यांसह उपस्थित होत्या. युवा महोत्सवात आपल्या कलागुणांद्वारे विविध स्पर्धांमध्ये विजेते ठरलेल्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन या सोहळ्यामध्ये गौरविण्यात आले.